पक्षाच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे : जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे >>पान 2

हिंसाचार केल्यास सरकार गप्प बसणार नाही : चंद्रशेखर बावनकुळे >>पान 3

बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरु >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



अखेर विराट कोहलीसोबतच्या डेटिंगवर तमन्नाने सोडलं मौन, काय म्हणाली अभिनेत्री?

आतील पान

सुविचार
आत्मविश्वासाने प्रत्येक संकटाचा सामना करा.

apalavidarbhlivenews@gmail.com   मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 17 ■ मंगळवार, दि. 05 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# नवीन प्रभाग रचना, ओबीसी आरक्षणासह होणार महापालिका निवडणुका

## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, सर्व याचिका फेटाळल्या

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधी सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या. वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संबंधित दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आदेश दिल्यानुसार, नवीन प्रभाग रचनेनुसारच राज्यातील निवडणुका होणार आहेत.**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मे २०२१ पासून रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणासंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या निवडणुका रखडल्या होत्या. त्यावर निर्णय देत या निवडणुका ओबीसी आरक्षणानुसारच घेण्यात याव्यात असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार नवीन प्रभाग रचनेचे आदेश राज्य सरकारने दिले होते.

**औसा नगरपालिकेसंबंधी याचिका**

गेल्या महिन्यात, ६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या संबंधित निर्देश देऊन राज्य सरकारला निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णपणे राज्य सरकारचा असल्याचं त्यावेळी कोर्टाने सांगितलं होतं. त्यानुसार राज्य सरकारने नवीन प्रभाग रचनेचे आदेशही दिले होते. परंतु लातूरमधील औसा नगलालिकेसंबंधी एक हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली. त्यामध्ये नवीन प्रभाग रचनेवर आक्षेप घेण्यात आला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

**या आधी न्यायालयाने काय म्हटलं आहे?**

या आधी, दोन महिन्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला ओबीसी आरक्षणावरून काही निर्देश दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्यात नोटिफिकेशन काढा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या असं न्यायालयाने म्हटलं. १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी असंही न्यायालयाने म्हटलं होतं. सन २०२२ मध्ये जी प्रभागरचना झाली होती, तो कायदा रद्द करण्यात आला. तर २०१७ च्या पुनर्रचनेनुसार निवडणूक होणार आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या ७ वर्षापासून निवडणुकांच्या प्रतिक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. एका याचिकेवर सुनावणी करताना, न्यायालायने नव्या प्रभार रचनेसह निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या. त्यामुळे, आता लवकरच राज्यातील निवडणुकांचा बिगुल वाजणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आपली प्रतिक्रिया दिली. तर, आधी झेडपी अन् पंचायत समितींच्या निवडणुका होतील, अशी माहिती सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भातील या निकालाचे दोन अर्थ आहेत. मागील निर्णयात जुन्या ओबीसी आरक्षणाप्रमाणे निवडणुका घ्या असे न्यायालयाने सांगितले होते, तेच डायरेक्शन आता कन्फर्म झाले आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण पूर्णपणे या निवडणुकीत राहणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. तर, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, २०२२ प्रमाणे नाही तर २०१७ प्रमाणेच निवडणूक होतील. त्यामुळे, राज्य सरकारच्या दोन्ही मागण्या मान्य केल्या आहेत. ओबीसी आरक्षणासहितच या निवडणुका होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलं आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

आधी झेडपी अन् पंचायत समिती निवडणूक


राज्यातील नगरपालिका महानगरपालिका यांच्या प्रभाग रचनांचे काम जवळपास पूर्ण झाले असून ६ तारखेला राज्य सरकार निवडणूक आयोगाकडे हे दाखल करतील, अशी माझी माहिती आहे. पहिल्यांदा जिल्हा परिषद, पंचायत समिती, नंतर नगरपालिका आणि नंतर महानगरपालिका यांच्या निवडणुका घेतल्या जातील, असा अंदाज असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाचा आज निकाल आल्यानंतर संजय शिरसाट यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

# आमच्या लढ्याला यश, सर्व अडथळे दूर झाले : भुजबळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. महाराष्ट्रातील २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या याचिकेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाला विरोध करण्यात आला होता. त्यानंतर आज न्यायालयाने आरक्षणासह निवडणुका घेण्यास परवानगी दिली आहे. यामुळं राज्यात २७ टक्के आरक्षणासह निवडणुका होणार आहेत. यावर मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दोन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. प्रभाग रचना आणि ओबीसी आरक्षण संदर्भातील याचिका फेटाळल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयात अनेकजण गेले होते. ओबीसी संख्या माहीत नाही त्यामुळं आव्हान देण्यात आलं होतं. देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर उद्धव ठाकरे यांचं सरकार आलं होतं. मात्र, कोरोना असल्यामुळं जणगणना शक्य नव्हती. जणगणना नाही त्यामुळं अंपेरिकल डेटा नव्हता असे मत मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केलं.



ओबीसी शिवाय महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश निवडणूक रखडल्या आहेत. त्यानंतर बांढीया कमिटीची स्थापना करण्यात आली. किती आरक्षण मिळणार ही भिती होती असे भुजबळ म्हणाले. प्रभाग रचने संदर्भात चॅलेंज करणारी याचिका आली होती. त्यावेळी आम्ही यात इंटरव्हिशेन केलं होतं. म्हणून समीर भुजबळ आणि महेश झगडे कोर्टात गेले होते असे भुजबळ म्हणाले. कोर्टाने सर्व पक्षकारांना विरोध आहे का? ते विचारल्याचे भुजबळ म्हणाले. त्यावेळी कोणीही विरोध केला नाही. त्यावेळी बांठीया कमिशनच्या आधी जे आरक्षण होतं ते मिळेल असा निर्णय दिला. आता परत काही लोक कोर्टात गेले होते. आता पुन्हा ओबीसी आरक्षण देऊन निवडणूक होणार हे स्पष्ट केल्याचे मत भुजबळ यांनी व्यक्त केले. आम्हाला आनंद झाला आहे. आमच्या लढ्याला यश आलं आहे. सर्व अडथळे दूर झाल्याचे भुजबळ म्हणाले.

# अमरावतीकरांसाठी दिलासादायक बातमी : खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा पुढाकार

## अमरावतीहून मुंबई, पुणे, दिल्ली व बेंगळुरूसाठी विमानसेवा सुरू करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** विदर्भातील शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्वाचे शहर असलेल्या अमरावतीसाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी मोठा पुढाकार घेतला आहे. नागरी विमानन राज्य मंत्री श्री. मुरलीधर मोहोळ यांना भेटून त्यांनी अमरावतीहून मुंबई, पुणे, दिल्ली व बेंगळुरूसारख्या प्रमुख शहरांसाठी दररोजची विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली आहे.

डॉ. बोंडे यांनी आपल्या निवेदनात अमरावती हे शिक्षणासाठी प्रमुख केंद्र असून, येथे हजारो विद्यार्थी देशभरातून उच्च शिक्षणासाठी येतात, असे नमूद केले. याशिवाय PM MITRA योजनेअंतर्गत प्रस्तावित टेक्सटाईल पार्क, औद्योगिक प्रकल्प आणि आयटी पार्कमुळे येथील व्यापारी आणि उद्योजक वर्गासाठी दळणवळणाचे सुलभ पर्याय आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांनी मंत्र्याकडे काही प्रमुख मागण्या केल्या आहेत त्यामध्ये अमरावती ते मुंबई दररोज नियमित विमान सेवा तातडीने सुरू करावी. अमरावती ते पुणे, दिल्ली व बेंगळुरू यांसारख्या शहरांसाठी विमान सेवा लवकरात लवकर सुरू करावी. योजनेतून अमरावती विमानतळाचा समावेश करून त्याचा विकास करावा. व अमरावतीला राष्ट्रीय हवाई दळणवळण केंद्राशी जोडण्यास प्राधान्य द्यावे.



या पुढाकारामुळे अमरावतीतील शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. नागरिकांमध्ये समाधानाची लहर असून, केंद्र सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बुलढाणा अर्बन बँक ढाणकी शाखा येथे लिपिकाने केला लाखो सोन्याचा अपहार

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील ढाणकी शाखा येथील बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बुलडाणा मधील २आगस्ट रोजी बँकेतील लॉकरमधून तारण ठेवलेले सत्तावन लाख रुपयाचं सोनं चोरणाऱ्या लिपिक व त्याच्या मित्राच्या विरुद्ध बिटरगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल.

सविस्तर माहिती अशी की लिपिक उमेश वाघ आपल्या मित्रा सोबत चोरलेले सोनं ढाणकी येथील सराफा दुकानात विकत असताना सराफा दुकानदाराने त्याचे बिंग फोडता तो तेथून फरार झाला. ही वार्ता गावात पसरताच बँकेच्या ग्राहकानी आपल सोनं सुरक्षित आहे की नाही?हे बघण्यासाठी बँकेसमोर एकच गर्दी केली होती. जेंव्हा ढाणकी मध्ये सोन्याचा अपहार घडल्याचे मुग्धा देशपांडे बुलढाणा बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बुलडाणा विभागीय व्यवस्थापक यवतमाळ यांना कळताच ते रविवारी बँकेत चौकशीला आले असता बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बुलडाणा मल्टिस्टेट शाखा ढाणकी मधील उमेश सुनील वाघ याने सोने तारण कर्ज विभागातील ३० सोने तारण पाकीट ज्याचे अंदाजे आज रोजी चे बाजार मूल्य रुपये ५७ लाख रुपये हे सदर कपाटामधून १५ जुलै ते ०३आगस्ट २०२५ या मध्ये अपहार केल्याचे दिसून येताच,उमेश सुनील वाघ (२८)व रामेश्वर गजानन धुमाळे (२८ ) दोघेही रा. बेलखेड ता उमरखेड यांच्या विरोधात बिटरगाव पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमाक व कलम ३१६ (५),३१८(३) ३१८(४),३१९(२), ३ (५) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोद करण्यात आला असून. पुढील तपास कुमार चिता पोलीस अधिक्षक यवतमाळ, अप्पर पोलीस अधिक्षक यवतमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड याच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरिक्षक पांडुरंग शिंदे, पोउपनि सागर अन्नमवार हे करीत आहे.




सोने लंपास करणारा उमेश वाघ हा बुलढाणा अर्बन बँक शाखा ढाणकी येथे लिपिक पदावर दोन वर्षापासून कार्यरत आहे. त्याने ज्या ग्राहकाचे सोनं लंपास केले आहे त्यांची भरपाई आमची बँक करणार आहे.

**-मुग्धा देशपांडे**
**बुलढाणा अर्बन बँक विभागीय व्यवस्थापक यवतमाळ**

**काही महिन्याखाली ढाणकीत पतसंस्थानी ग्राहकांना चुना लावला असून त्यात राजस्थान व राजलक्ष्मी तसेच एका बँकेत कर्मचाऱ्याने बनावट सोने बनवुन बँकेत ठेवले घटना घडल्या असताना आज बुलढाणा अर्बन बँक मधील सोनं अपहार झाल्यामुळे ढाणकीत बँकेत पैसे, सोनं ठेवणं जोखीमचे झाल्याचे नागरिक म्हणत आहे.**

# जीएसटी संग्रहणात 'इतक्या' कोटीसह महाराष्ट्रच प्रथम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जीएसटी संकलनातील योगदानात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. त्यानंतर कर्नाटक (७म), तामिळनाडू (८म) राज्यांनी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर कर संकलनात नोंद केली. महाराष्ट्राने जुलैपर्यंत ३०५९० कोटींचा कर गोळा के ला आहे. देश पातळीवर बघितल्यास मागील वर्षाच्या जुलैपर्यंत जीएसटी संग्रहणात मध्ये १८२०७५ कोटीची वाढ झाली होती. जी तसेच देशपातळीवर जुलै महिन्यातील जीएसटी संग्रहणात मध्ये इयर ऑन इयर बेसिसवर ७.५म अधिक वाढ होती. सरकारने दिलेल्या तात्पुरत्या आकडेवारीत मधील ही माहिती पुढे आली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरतेतही वाढलेल्या आर्थिक देशांतर्गत उलाढालीने ही वाढ झाल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

इयर टू डेट बेसिसवर जीएसटी संग्रहणात १०.७म वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या याच जुलै महिन्यात संग्रहण ७.३९ लाख कोटी होते ते वाढत या जुलैपर्यंत ८.१८ लाख कोटींवर गेले आहे. घरगुती महसूलात ६.७म वाढ झाली असून ती वाढ १.४३ लाख कोटींपर्यंत पोहोचली आहे. तर जीएसटी परतावा माध्यमातून इयर ऑन इयर बेसिसवर ६६.८म वाढ झाल्याने संग्रहण परतावा २७१४७ कोटींवर पोहोचला. एप्रिल महिन्यात जीएसटी संकलनात १२.६म वाढ झाली जी २.३७ लाख कोटींच्या रेकॉर्ड ब्रेक वाढीसह सरकारने नोंदवली होती. यावर्षीच्या अर्थसंकल्पात सरकारने आगामी वर्षात ११म वाढ होईल असे सूतोवाच केले होते.

सरकारच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, जुलैमध्ये निव्वळ जीएसटी महसूल १,६८५८८ कोटी होता जो जुलै २०२४ मध्ये १६५८०० कोटी होता, त्यात जुलैत १.७म वाढ झाली आहे. ही मंदावलेली वाढ मुख्यत्वे एकूण परताव्यात ६६.८म वाढ झाल्यामुळे झाली, जी जुलै २०२५ मध्ये गेल्या वर्षीच्या १६,२७५ कोटी होती, जी वाढून २७,१४७ कोटी झाली आहे. माहितीनुसार मासिक वाढीची मंदी असूनही एप्रिल-जुलै २०२५ साठी एकत्रित निव्वळ जीएसटी महसूल ८.४म वाढून ७.११ लाख कोटी झाला, जो गेल्या वर्षीच्या याच कालावधी तील ६.५६ लाख कोटी होता. त्यामुळे जीएसटीतील वाढ समाधानकारक असल्याचे म्हटले जात आहे.

## ओटीटी प्लॅटफॉर्मसाठीही सेन्सॉरबोर्ड हवे

कोरोना काळात लॉकडाउन असल्याने चित्रपटगृहे बंद होती अशावेळी नवीन चित्रपटांच्या प्रसारणासाठी निर्माते, दिग्दर्शकांनी ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती दिली. प्रेक्षकांनाही हा नवा पर्याय खूप आवडला कारण चित्रपटगृहात न जाता घरात बसून आपल्या लॅपटॉपवर, कॉम्प्युटरवर किंवा अगदी हातातल्या मोबाईलवर देखील नवा चित्रपट पाहायला मिळू लागला त्यामुळे प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्मला पसंती देऊ लागले. ओटीटी प्लॅटफॉर्मची लोकप्रियता जशी वाढत गेली तसे निर्माते दिग्दर्शक या प्लॅटफॉर्मवर चित्रपट प्रदर्शित करू लागले. त्यातही सलग तीन तास छोट्या स्क्रीनसमोर प्रेक्षकांना बसणे शक्य होत नाही हे लक्षात आल्यावर निर्मात्या दिग्दर्शकांनी त्यालाही पर्याय शोधून काढला तीन तासांचे चित्रपट सहा ते दहा भागात वेबसिरीजच्या रूपात प्रदर्शित करू होऊ लागले. ओटोटीच्या या वेबसिरीजला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. हिंदी वेबसिरीजने तर कमालीची लोकप्रियता मिळवली. या वेबरीजममध्ये चित्रपटसृष्टीतील सर्वच दिग्गज कलाकार भाग घेऊ लागले. चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉरबोर्डची मान्यता आवश्यकता असते. तशी वेबसिरिजना नसते त्यातही या वेबसिरीजचे सर्वाधिक प्रेक्षक हे २० ते ४० या वयोगटातील म्हणजे तरुण असतात. सेन्सॉरबोर्ड नाही आणि प्रेक्षक तरुण मग काय निर्माते दिग्दर्शकांनी वेबसिरीजद्वारे ओटीटी ॲप्सवर अश्लीलतेचा भडिमार सुरू केला. अश्लीलतेचा भडिमार असलेल्या अशा शेकडो ॲप्स ओटोटी प्लॅटफॉर्मवर धुमाकूळ घालू लागल्या. अलीकडील काळात तर अश्लील ओटोटी ॲप्सचा इंटरनेटवर महापूर आला. या ओटोटी ॲप्सवर अश्लीलतेचा अक्षरशः नंगानाच चालू झाला. फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर या ओटीटी ॲप्स आणि वेबसिरीजची अश्लील दृश्ये मुद्दामहून प्रसारित केली जाऊ लागली जेणेकरून तरुण मुले ही ॲप्स आणि वेबसिरीज पाहतील. तरुण मुलांना अश्लीलतेकडे घेऊन जाणाऱ्या या अश्लील ॲप्सवर आणि वेबसिरीजवर बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वत्र ही मागणी होऊ लागली. संसदेत देखील काही खासदारांनी अश्लील ॲप्सवर बंदी घालावी अशी मागणी केली. काही सुजाण नागरिकांनी त्यासाठी न्यायालयाची दारे देखील ठोठावली. सुजाण नागरिकांच्या या मागणीला अखेर यश मिळाले. मागील आठवड्यात केंद्र सरकारने देशातील २५ ओटीटी ॲप्स वर बंदी घातल्याची घोषणा केली. बंदी घालण्यात आलेल्या ओटीटी ॲप्समध्ये उल्लू, एएलटीटी आणि डिसिफ्लिक सारख्या काही मोठी नावे समाविष्ट आहेत. माहिती प्रसारण मंत्रालयाने यासंदर्भात एक अधिसूचनाही जारी केली आहे. त्यात म्हटले आहे की या निर्णयाचा मुख्य उद्देश अश्लील सामग्रीचा प्रसार रोखणे हा आहे. अशी सामग्री भारतीय कायदेशीर आणि सांस्कृतिक मानकांचे उल्लंघन करणारी मानली जातात. बंदी घालण्यात आलेल्या अन्य ॲप्समध्ये बिगशॉट, बूमएक्स, नवरासा लाईट, गुलाब ॲप, बुल ॲप, जलवा ॲप, कंगन ॲप, वॉव एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिट प्राईम, फेनियो, शोएक्स, सोल टॉकिज, अड्डा टीव्ही, हॉट एक्स, व्हीआयपी, हलचल ॲप, मूड एक्स, निऑन एक्स, फुगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स यांचा समावेश आहे. सरकारने इंटरनेट सेवा प्रदात्यांना भारतात या वेबसाइटवर सार्वजनिक प्रवेश थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. या अश्लील ॲप्सवर बंदी घालण्याच्या सरकारच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागतच होत आहे. केवळ या २५ ॲप्सवरच नाही तर यासारख्या ज्या ज्या ॲप्सवर अश्लीलतेचा नंगानाच चालू आहे अशा सर्वच ॲप्सवर सरकारने बंदी घालायला हवी. याशिवाय ओटीटी प्लॅटफॉर्मवर सुरू असणाऱ्या सर्वच अश्लील वेबसिरिजवर देखील बंदी घालायला हवी. ओटीटी प्लॅटफॉर्मवर चालू असलेल्या अश्लील वेबसिरिज समाजाचा समतोल बिघडवत आहेत. या वेबसिरीज मोबाईलवर पहायला मिळत असल्याने अल्पवयीन मुलेही या वेबसिरीज चवीने पाहत असतात. वेबसिरिजसाठी सेन्सॉरबोर्ड नसल्याने यात काहीही दाखवले जाते. आक्षेपार्ह, अश्लील, लोकांच्या भावना दुखावणारे, भावना चाळवणारे, हिंसेला, व्यसनाला प्रोत्साहन देणारे असे सर्व ज्यांच्यावर सर्वसाधारण स्थितीत बंदी घातली जाऊ शकते किंवा प्रौढांसाठी म्हणून बिरूद लावले जाऊ शकते असे सर्वकाही दाखवले जाते. सेन्सॉरबोर्ड नसल्याने निर्माते दिग्दर्शक आक्षेपार्ह दृश्ये दाखवतात. वेबसिरिजना चित्रपटासारखे स्वतंत्र सेन्सॉरबोर्ड लागू केले तर या गोष्टींना आळा बसेल चित्रपट असो की वेबसिरीज सेन्सॉरबोर्डने मान्यता दिल्याशिवाय ओटोटी प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात येऊ नये.

# पक्षाच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे : जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरघोस यश मिळवण्यासाठी पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे, असे आदेश भाजपा चे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे यांनी रविवारी (दि.०३) पक्षाच्यावतीने आयोजीत कार्यकर्ता संवाद मेळाव्यात दिले.

शहरातील बनमेरू कॉलेज च्या जुन्या बिल्डिंग मध्ये घेण्यात आलेल्या या मेळाव्याला माजी जिला अध्यक्ष गणेश मांटे ,प्रकाश गवई, दत्ता पाटील, विजय पवार, चंद्रकांत बरदे, संतोष काळे,चक्रधर लांडे यांच्या सह शहर व तालुक्यातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शिंदे यांनी तडाखेबंद भाषणातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुकले. त्यांच्या या भाषणाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे पहायला मिळाले.

याप्रसंगी व्यासपीठावर जीलाअध्यक्षा सह विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी शिंदे म्हणाले, की ही केवळ पदाधीकारी व कार्यकर्ता बैठक नसून, पक्षाच्या नव्या वाटचालीची सुरुवात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक कार्यक्रम लागत आहे ,ह्या मध्येआगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षाच्या सर्वाधिक जागा निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकसंघ काम करणे गरजेचे असल्याचे सांगत या निवडणुकाबाबात रणशिंग फुकले

दरम्यान लोकसभा निवडणुकीवेळी विरोधी पक्षांनी एनडीएचे सरकार पुन्हा सत्तेत आले तर संविधान बदलले जाईल, असा फेक नरेटिव्ह सेट केला होता. त्यामुळे महाराष्ट्रात महायुतीची पिछेहाट झाली. मात्र विधानसभा निवडणुकीवेळी लाडकी बहीण योजना यासह शेतकऱ्यांसाठीच्या योजनांमुळे राज्यात महायुतीला भरघोस यश मिळाल्याचे शिंदे यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा सांगतीला.विरोधक फक्त टीका करत बसतात, पण आम्ही काम करून दाखवतो, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावर पुढे जात असून, आगामी निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या मेळाव्यात शिंदे यांच्या उपस्थितीत शहरा सह ग्रामीण भागांतील कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण झाल्याचे दिसून आले. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष, युवा आघाडीचे कार्यकर्ते, महिला पदाधिकारी आणि जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यामुळे लोणारमध्ये भाजपा ची ताकद वाढली असल्याचे दिसून आले.

### शहर अध्यक्ष पदी शुभम बनमेरु तर तालुका कार्याध्यक्ष पदी गजानन मापारी

यावेळी शहरातील व तालुक्यातील सर्व कार्यकर्ते यांच्या पाठिब्याने शहर अध्यक्ष पदी शुभम बनमेरू यांची फेरनिवड करण्यात आली तर तालुका अध्यक्ष निवडी पासून पक्षावर नाराज असलेले गजानन मापारी यांची तालुका कार्यध्यक्ष पदी म्हणून निवड करण्यात आली



# अखेर विराट कोहलीसोबतच्या डेटिंगवर तमन्नाने सोडलं मौन, काय म्हणाली अभिनेत्री ?

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवुड अभिनेत्री तमन्ना भाटिया आणि भारतीय क्रिकेटर विराट कोहलीचा एक जुना फोटो सध्या चर्चेत आहे. हा फोटो व्हायरल होताच सोशल मीडियावर अफवा पसरू लागल्या की, दोघांनी एकमेकांना डेट केल आहे. आता अखेर तमन्नाने या मुद्द्यावर आपली प्रतिक्रिया दिलीय. तिने स्पष्ट केलं आहे की, या वृत्तांमध्ये काहीही तथ्य नाही.

तमन्ना विराट बद्दल म्हणाली, मी त्याला..

एका मुलाखतीत तमन्ना भाटियाला व्हायरल झालेल्या फोटोबद्दल विचारण्यात आले. तेव्हा ती म्हणाली की, विराट कोहली सोबत एका जाहिरातीसाठी शूट करण्यात आलं होतं. आणि ती म्हणाली, फक्त त्याचवेळी एक दिवस मी त्याला भेटले. आणि त्यानंतर कधी त्याला भेटले नाही. न त्याच्याशी बोलले. तमन्ना म्हणाली, मला खरंच खूप वाईट वाटतं. कारण मी एकच दिवस त्याला भेटले होते.

तमन्नाने सांगितलं की, एका फोटोच्या आधारावर अफवा पसरवणे चुकीचे आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीशी काहीही संबंध नसतो. तेव्हा अशा प्रकारच्या अफवा त्रासदायक ठरतात. सेलिब्रिटीच्या नात्याने अशा अफवांमुळे खासगी जीवनावर परिणाम होतो. प्रत्येक गोष्ट नियंत्रणात ठेवणे कठीण होते. तमन्ना म्हणाली की, लोक जे विचार करतात, ते बोलतात. तुम्हा सर्वांना समजवू शकत नाही की, सत्य काय आहे.

## मोबाईल चोरट्यास पोलिसांकडून अटक

**कल्याण/प्रतिनिधी :** आंबिवली शहाड दरम्यान धावत्या मेल मधील प्रवासाच्या हातावर फटका मारून लूट प्रकरणात कल्याण जीआरपी पोलिसांनी एका अल्पवयीन इराणी तरुणाला ताब्यात घेतले आहे. या घटनेत प्रवासी गौरव निकम यांचा एक पाय ट्रेनच्या चाकात अडकल्याने कापला गेला. गौरव निकम यांच्यावर सायन येथील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अल्पवयीन तरुणावर या आधी देखील फटका मारत प्रवाशांला लुटल्याचे पाच गुन्हे दाखल आहेत. अल्पवयीन असल्याचा फायदा घेत हा तरुण जामीनावर बाहेर येतो आणि परत गुन्हा करतो. आज या अल्पवयीन तरुणाला कल्याण न्यायालयात हजर करून रेल्वे पोलीस या अल्पवयीन तरुणावर सज्ञान आरोपी म्हणून खटला चालवावा, अशी रेल्वे पोलीस न्यायालयाला विनंती करणार आहे.अशी माहिती कल्याण जाआरपीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ कांदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



# राहुल गांधी वेडे झालेत ते कधी निवडणूक आयोगावर, कधी सैन्यावर बोलतात : चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राहुल गांधींना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. राहुल गांधी वेडे झाले आहेत. ते कधी निवडणूक आयोगावर, कधी सैन्यावर बोलतात. त्यांना अजून या देशाची दिशा कळालेली नाही. त्यांना काही दिवस प्रशिक्षणाची गरज आहे. जर विदेशात चांगले प्रशिक्षण मिळत असेल, तर त्यांनी एकदा विदेशात जाऊन यावे. अन्यथा, आमच्याकडेही चांगल्या प्रशिक्षण संस्था आहेत. त्यांनी आम्हाला सल्ला मागितला, तर कुठे जायचे याबाबतचा सल्ला आम्ही राहुल गांधींना देऊ शकतो. अशी टिका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

यावेळी ते म्हणाले की, महसुली सप्ताहाचा चौथा दिवस आहे. प्रत्येक मंडळात छत्रपती शिवाजी महाराज अभियान सुरू झाले आहे. शैक्षणिक कामासाठी दाखल्याची गरज भासते, त्यासाठी हे अभियान सुरू करण्यात आले आहे.राज ठाकरे यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की,मराठी भाषा ही आमच्या रक्तातील भाषा आहे. मराठी भाषा महाराष्ट्राला देशातील सर्वोत्तम राज्य करणारी भाषा आहे. मराठी भाषेसाठी आम्ही सर्वजण एकाच विचाराचे आहोत. मात्र, हिंदी भाषा बोलणाऱ्या व्यक्तीवर आपण कोणत्याही प्रकारची बोली भाषेवरील




बंदी आणू शकत नाही. मराठीसोबत हिंदी बोलणाऱ्यांवर मारहाण करणे, हे राज्याला शोभणारे नाही. मराठी आपली भाषा आहे, पण त्याचसोबत हिंदीचाही सन्मान केला पाहिजे. राज ठाकरे यांची ही भूमिका योग्य आहे. ठाकरे यांचे 'हेवेदावे' विधानावर बोलताना म्हणाले की,भाजप महायुतीने ५१ टक्के मतदानाची तयारी केली आहे. विधानसभेत देखील आम्हाला ५१.७८ टक्के मते मिळाली.

राज ठाकरे आणि त्यांच्या मित्र पक्षांनी काय तयारी केली आहे, हे मला माहीत नाही. मात्र, आमची तयारी पूर्ण झाली आहे. कोणीही आले आणि लढले तरीही ५१ टक्के मते महायुतीलाच मिळणार आहेत. त्यावेळी कॉंग्रेस, शरद पवार यांचा पक्ष किंवा ठाकरे यांचा पक्षाला कही जागा मिळणार नाही. कारण जनतेने ठरवले आहे की देशात नरेंद्र मोदी देशाला समृद्ध करत आहेत आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचा विकास करत आहेत. त्यामुळे जनता विकासाच्या बाजुनेच जाणार आहे. ठाकरे युती संदर्भात बोलताना म्हणाले की,ज्यांची निवडणूक लढविण्याची तयारी नाही, ते लोक अशा प्रकारची विधाने करतात. आम्ही उद्या निवडणुका लागल्या तरीही पूर्णपणे तयार आहोत. एक कोटी ५१ लाख सदस्य असलेला भाजप, तसेच अजित पवार आणि एकनाथ शिंदे तयार आहेत. ते काय करणार हे मला माहीत नाहीत. मात्र, आमची तयारी पक्की आहे. कोणीही वादग्रस्त वक्तव्य करू नये. ''बाप काढला'' किंवा अशा प्रकारचे शब्द वापरू नयेत. राज्यात आम्ही सर्व भाऊभावाप्रमाणे काम करत आहोत. भाजप मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. मला संपूर्ण विषय माहीत नाही, पण ''बाप'' असे शब्द वापरले असतील, तर ते योग्य नाही. एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौऱ्याशी काही संबंध नाही, दिल्लीचा महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी काहीही संबंध नाही. जागावाटपाचा निर्णय आम्ही अजित पवार, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस मिळून घेणार आहोत. दिल्लीत एकनाथ शिंदे यांची झालेली भेट स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडित असू शकत नाही. मंत्र्यांनी वादग्रस्त विधान करू नये, असे मी आणि मुख्यमंत्र्यांनी आधीच सांगितले आहे. मेघना ताईंशी मी बोललो. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या वक्तव्याचा संदर्भ वेगळा होता. तरीसुद्धा मंत्री म्हणून आचारसंहिता पाळणे आणि वादग्रस्त विधान टाळणे आवश्यक आहे.असे मतही यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा तर वनविभागांतर्गत वनगुन्हा दाखल

## अतिक्रमणधारकांवरील कार्यवाही नियमानुसारच- उपवनसंरक्षक सरोज गवस यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मोताळा तालुक्यातील माळेगावमधील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वनविभागांतर्गत सुध्दा वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही नियमानुसार व कायद्याचे पालन करुन करण्यात आली आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

दि. २३ जुलै २०२५ रोजी मोताळा वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे मोहेगाव, राजुर वनपरिमंडळ, पूर्व खैरखेड बिटअंतर्गत वनखंड क्र.३२३ मध्ये अवैधरित्या केलेल्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी वनविभागाचे अधिकारी कर्मचारी, पोलीस अधिकारी कर्मचारी व महसूल अधिकारी, राज्य राखीव पोलीस तुकडी यांचेसह गेल्यावर झोपड्या व पाल काढत असतांना अचानकपणे १०० ते १५० लोकांच्या समुहाने येऊन कर्मचा-यावर दगडफेक, डोळ्यात मिरची पावडर फेकली व काठ्या, कोयता, कुऱ्हाडी याने प्राणघातक हल्ला केला होता. हा हल्ला केल्यावर त्या ठिकाणावरुन कर्मचारी वाहनात बसून बाहेर येत असतांना त्या वाहनांना घेरुन वाहनांवर हल्ला केला होता. यामध्ये वाहनांवर दगडफेक केल्याने वाहनांच्या काचा फुटल्या व त्यातील कर्मचारी गंभीर जखमी झाले होते. अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी आणलेल्या जेसीबीची तोडफोड केली होती. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) मेहकर यांचे बोलेरो वाहनाची संपुर्ण तोडफोड करुन जाळुन देण्याचा प्रयत्न केला व इतर वाहने सुध्दा फोडण्यात आले. या हल्ल्यामध्ये वनविभागाचे ५ कर्मचारी (दोन महिला व तीन (पुरुष), पोलीस विभागाचे ८ कर्मचारी (६ महिला व २ पुरुष) व राज्य राखीव पोलीस दल तुकडी मधील १ जवान (पुरुष) हे गंभीररित्या जखमी झाले असुन या कर्मचाऱ्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या वनजमीनीवरील अतिक्रमणधारकांनी शेतीसाठी वनहक्क दावे दाखल केले होते. तथापि, घरासाठी दावे दाखल नव्हते. या शेतीच्या दाव्याबाबतचे जिल्हा वनहक्क समितीने सन २०२२ मध्ये वनहक्क दावे नामंजूर करण्यात आले होते. यानंतर दावेधारकांनी या दाव्यावर पुनर्विलोकन अर्ज केला व पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. यानुसार दाव्यावर जिल्हा वनहक्क समिती मार्फत पुनर्विलोकन करण्यात आले व यामध्ये सन २०२४ मध्ये सदर दावे पुन्हा नामंजूर करण्यात आले. यानंतर वन विभागामार्फत अतिक्रमण काढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये कार्यवाही करण्यात आली. यानुसार सहाय्यक वनसंरक्षक (प्रा व कॅम्पा) बुलढाणा यांनी माहे जानेवारी २०२५ ते फेब्रुवारी-२०२५ कालावधीमध्ये अतिक्रमणधारकांना जमिनीवरचे सर्व पुरावेसह कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पत्राने कळविले होते. यानुसार या कालावधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) मोताळा व गैरअर्जदार अतिक्रमणधारक यांच्यात सुनावणी घेण्यात आली. अतिक्रमणधारकांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले पुरावे यांचा विचार करून सहाय्यक वनसंरक्षक यांनी सदर क्षेत्राबाबत अतिक्रमण निष्कसनाचे आदेश जारी करण्यात आले. अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्याअगोदर सदर क्षेत्र खाली/रिकामे करण्याबाबत व निघून जाण्याबाबत १५ दिवस अगोदर संबंधित अतिक्रमणधारकांना वैयक्तिकरित्या नोटीसद्वारे कळविण्यात आले होते. तसेच ३० एप्रिल २०२५ रोजी स्थानिक वृत्तपत्रातूनही सुचित करण्यात आले होते. यानंतर दिनांक ९ मे ते १९ मे २०२५ या कालावधीत अतिक्रमण निष्कसनाची कायदेशीर कार्यवाही करुन राजुर वर्तुळ मधील मौजे खैरखेड, तरोडा, मोहेगाव, कोथळी, काजमपुर येथील वनजमिनीवरील एकूण ४००.०८७ हेक्टर क्षेत्र हटविण्यात आले. यामध्ये माळेगाव मधील सर्व झोपड्या निष्काशीत करण्यात आल्या व त्या ठिकाणी जल मृदा संधारणासाठी जलशोषक चर घेण्यात आले. या क्षेत्रावर वनविभागामार्फत वृक्ष लागवड प्रस्तावित करण्यात आली. यानंतर दि.३० जून २०२५ रोजी अतिक्रमणधारक एका दिवसात ट्रॅक्टर टेम्पोने सामान घेऊन आले. अवैधपणे वन क्षेत्रावरील जल मृदा संधारणाची कामे बुजवून व अवैध वृक्षतोड करुन नव्याने घरे व झोपड्या बांधल्या. याबाबत दि. ११ जुलै २०२५ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी यांनी अतिक्रमणधारकांना वनक्षेत्रावरुन निघुन जाण्यास सांगितले असता त्यांनी नकार दिला. त्यानंतर झालेल्या या घटनेच्या अनुषंगाने मोताळा तालुक्यातील माळेगावमधील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वनविभागांतर्गत सुध्दा वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही नियमानुसार व कायद्याचे पालन करुन करण्यात आली असल्याची माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी दिली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कोल्हापुरात शिवसेना ठाकरे गटाकडून महानगरपालिकेला घेराव घालून आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आणि सामान्य नागरिकांच्या वतीने कोल्हापूर महानगरपालिकेत चाललेल्या भ्रष्टाचाराविरुद्ध, नागरी समस्यांबाबत जाब विचारण्यासाठी आंदोलन करण्यात आले आहे. मोटरसायकल आणि रिक्षा रॅलीसह महानगरपालिकेला घेराव घालून हे आंदोलन करण्यात आले. अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराविरोधात आक्रमक भूमिका शिवसेनेकडून घेण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षण, जयप्रभा स्टुडिओ, १०० कोटी रस्ते घोटाळा असे पोस्टर्स या आंदोलनात हातात धरण्यात आले होते. तसेच रिक्षांवरही लावण्यात आले आहेत. यावेळी पोलिसांनी याबाबतचे निवेदन स्विकारले.

### जालना पोलिसांकडून शहरात कर्कश आवाज करणाऱ्या ६५ बुलेट जप्त



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** आज जालना पोलिसांनी व वाहतूक शाखेने संपूर्ण जालना शहरात व परिसरात कर्कश आवाज करत फिरणाऱ्या बुलेट गाड्यावर जप्तीची कारवाई करत त्या शहर वाहतूक शाखेत जमा केल्या आहेत. मागील कित्येक दिवसांपासून पोलिसांकडे व शहर वाहतूक शाखेकडे या बुलेट संदर्भात तक्रारी येत होत्या. या बुलेटचा कर्कश आवाजाने सीनियर सिटीजन यांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने आज ही सदरची कारवाई करण्यात आली आहे. संपूर्ण शहरभरात व परिसरात वाहतूक शाखा जालना व जालना पोलिसांच्या टीमने सदर बुलेट जप्त करत, त्या वाहतूक शाखा मुख्य कार्यालय जालना येथे आणून त्यांच्यावर कारवाई केली आहे. व यामध्ये मुख्य म्हणजे या बुलेटना जे कर्कश आवाज करणारे सायलेन्सर इन्स्टॉल केले जातात, त्या दुकानदारांवर व मेकॅनिकल यांच्यावर सुद्धा येत्या काही दिवसात असेच इंस्टॉलेशन आढळून आल्यास कारवाई केली जाईल. असा इशारा सुद्धा यावेळी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिली आहे.

### पुण्यात तीन तरुणींवर बेकादेशीर कारवाई करणाऱ्या पोलीसांवर तात्काळ कारवाई करा: सपकाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील पोलीस यंत्रणा असून अडचण नसून खोळंबा अशी आहे. गुन्हेगार मोकाट फिरतात आणि पोलीस मात्र सर्वसामान्य जनतेवर कायद्याची दंडेलशाही दाखवत आहेत. पुण्यातील कोथरूड पोलीसांनी तीन तरुणींच्या घरात घुसून त्यांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेतले, त्यांना जातिवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. ज्या पोलिसांनी हा प्रताप केला आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ का केली जात आहे? या पोलिसांवर ॲट्रॉसिटी कलमाखाली तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, एका महिलेला मदत केल्याच्या कारणावरून या तीन सामाजिक कार्यकर्त्या तरुणींच्या घरात घुसून पोलिसांनी ही कारवाई केल्याचे समजते. या मुजोर पोलिसांना कोण पाठिशी घालत आहे? पुण्याचे पोलीस आयुक्त काय खुर्चीवर बसून झोपा काढतात काय. कोणाच्या दडपणाखाली पोलीस काम करत आहेत. तीन तरूण मुलींवर पोलीस अत्याचार करतात आणि कारवाई होत नाही. एफआयआर नोंदवण्यास कोणत्या मुहुर्ताची वाट पहात आहेत.

# हिंसाचार केल्यास सरकार गप्प बसणार नाही : चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा काळ गेला. खरं हिंदुत्ववादी विचाराची आंदोलन त्यांनी आहे. आता कायद्याचे राज्य आहे. हिंसाचार केल्यास सरकार चूप बसणार नाही, सरकार सोडणार नाही. कुठे हिंसाचार करतात, बघू किती धमक आहे. ते सुद्धा बघू इथे कायद्याने राज्य आहे. या महाराष्ट्रात मराठी भाषा याविरुद्ध कोणी बोलत असेल तर आम्ही सहन करणार नाही. असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

महसूल परिषदेमध्ये विविध विषयावर अभ्यासगट तयार करून महसुली प्रशासनात काय बदल केले. जुने कायदे कालबाह्य झाले आहेत. त्यात बदल काय केला पाहिजे, डीपीसी याच्यात काय बदल केले पाहिजे यावर चर्चा झाली. शेतकऱ्यांच्या मोजण्या होत नाही, कामात काय बदल केले पाहिजे, २०३५ चा विकसित महाराष्ट्र आणि त्यासाठी लागणारे महसूल खात्याचे काम यासाठी दिशा देण्याचं नियोजन झाल आहे. यात साडेतीनशे सुधारणा महसूल विभागाने सुचवले आहे. सर्व सूचना या महत्त्वाच्या या केल्यास महसूल विभाग महाराष्ट्रात नंबर १ ठरेल. शरद पवार यांच्याबाबत देवेंद्र फडणवीस कधीही काहीच बोलत नाही. ते जबाबदारीने बोलतात, त्यांना सर्व माहिती आहे. त्यामुळे त्यांनी स्पष्टता आणली असेल. उद्धव ठाकरे यांनी पाच वर्षे उरले सुरले कार्यकर्ते आहे ते सांभाळायचे आहेत. त्यामुळे त्यांना असं बोलावं लागतं हे बदलणार आहे ते बदलणार आहे.

उद्धव ठाकरे पक्ष बदल आमच्याकडे सुरू आहे. मतदार यादी चुकलेली, बोगस मतदान असे विषय घेऊन उद्धव ठाकरे बोलत आहे. असं बोलल्यास सोडून जाणारे पार्टीचे लोक थांबतील. तुटणारी पार्टी थांबवण्यासाठी उद्धव ठाकरे असे बोलत असतात. संजय राऊत यांना खूप सिरीयस घ्यायचं नसतं. त्यांच्याकडे हिंसाचार करणारी टीम नाही आहे. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा काळ गेला. खरं हिंदुत्ववादी विचाराची आंदोलन त्यांनी आहे. आता कायद्याचे राज्य आहे. हिंसाचार केल्यास सरकार चूप बसणार नाही, सरकार सोडणार नाही. कुठे हिंसाचार करतात, बघू किती धमक आहे. ते सुद्धा बघू इथे कायद्याने राज्य आहे. या महाराष्ट्रात मराठी भाषा याविरुद्ध कोणी बोलत असेल तर आम्ही सहन करणार नाही यापूर्वी सांगितले आहे. राज ठाकरे यांना कोणासोबत जायचं त्यांना त्यांच्या ठरू द्या, आमच्या माहिती म्हणून आम्ही निवडणुका लढणार आहे. धनंजय मुंडे बंगला सोडला नाही. बंगला सोडला की नाही आता, अजित पवार त्याबाबतीत निर्णय घेतील.उद्धव ठाकरे यांनी रोज गांधी कुटुंबासोबत जेवण करावं, नाश्ता करावा,अशी टिकाही यावेळी बावनकुळे



यांनी केली. मेघना बोर्डीकर यांच वक्तव्य तोडून मोडून दाखवलं. त्यामुळे वाद उद्धवला आहे. मी त्यांच्याशी उद्या बोलणार आहे.

खासदार दुबे यांच्या वक्तव्यावर बोलताना म्हणाले की, कोणी कोणाच राजकारण संपवत नाही, कोणी कोणावर टीका करण्यापेक्षा महाराष्ट्राचा विकासाचा काम केलं पाहिजे. बच्चू कडू यांच नाव घेतल नाही, अनके पश्चिम महाराष्ट्र नेते आहे ते नौकटंकी करत आहे. ते बच्चू कडूंसाठी नव्हतं, सभागृहात प्रश्न मांडत नाहीत. मात्र बाहेर जाऊन बसले होते. बच्चू कडू यांनी सांगितलेल्या बैठका आम्ही घेतल्या, दिव्यांग बांधवांचा महिना वाढला, ते इतर रोज अनेक नौटंकी आंदोलन सुरू आहे. परवा दांडी यात्रा निघाली असे आंदोलन सुरू आहे. त्यावर बोललो. गरीब माणसाचे कर्ज माफ झाले पाहिजे, त्यासाठी कमिटी केली आहे, आठ दिवसानंतर बैठक घेणार आहे. असेही बावनकुळे म्हणालेत.तसेच उद्या निवडणूक झाल्यास भाजप तयार आहे. यात प्रत्येक जिल्ह्यात मेळावे होतील, धाराशिव, बुलढाणा या भागात जाणार आहे, विधानसभा प्रमाणे ५१ टक्के मत घेऊन आम्ही जिंकणार आहे.असे मतही यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# युती म्हणून सर्वांनी महायुतीचा धर्म पाळावा

## दिपक केसरकर यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**सिंदुधुर्ग/प्रतिनिधी :** परिणय फुके वक्तव्यव्याबाबत बोलताना दिपक केसरकर म्हणाले की,एखाद्या कोणी केलेल्या विधानाला पक्षाचे विधान म्हणून बघू नये. अशी वक्तव्य करण्यापासून सर्वांनी संयम राखला पाहिजे. हे युतीचे शासन आहे. लोकांच्या आपल्याकडून खूप अपेक्षा असून, लोकांनी आपल्याला मोठ्या अपेक्षांनी निवडून दिले आहे. त्यामुळे लोकांची जास्तीत जास्त सेवा आपल्या माध्यमातून कशी होईल, यावर भर दिला पाहिजे, युती म्हणून सर्वांनी महायुतीचा धर्म पाळावा, असे आवाहन दिपक केसरकर यांनी माध्यमांशी बोलताना केले.

यावेळी ते म्हणाले की, माधुरी हत्तीनबाबत शासनाचा निर्णय आहे. पूर्वी लोक हत्तींचे पालनही करीत. मात्र, आता शासन मान्यता असलेल्या ठिकाणी त्यांना न्यावे लागते. पण हा लोकांच्या भावनेचा प्रश्न असून त्याचा विचार व्हावा. मी त्या ठिकाणचा पालकमंत्री होतो, त्यामुळे मी लोकांच्या भावना वनमंत्र्यांना कळवेन. दोडामार्ग हत्ती विषय याबाबत दोन पर्याय आहेत. तिलारी धरणाच्या मागच्या बाजुला कंपाउंड करून हत्तीचे त्या ठिकाणी संवर्धन करावे. तसेच पालकमंत्री येथील हत्तींबाबत "वनतारा"शी बोलले असतील तर तो एक पर्याय आहे. राज ठाकरेंनी काय करावे हा त्यांचा प्रश्न आहे. ते स्वतः चा निर्णय घेऊ शकतात. त्यांना यापूर्वी कशी वागणूक मिळाली हे त्यांनी बघितलंय. राज हे चांगले नेतृत्व असून त्यांना आमच्या कायम शुभेच्छा असतील.महिलांवर अन्याय



होऊ नये,या मताशी मी सहमत आहे. मात्र, कुणीही कायदा हातात घेऊ नये. राज्य सरकारने महिलांबाबत कडक कायदे केले आहेत. महायुतीमधील पक्षांनी एकमेकांच्या कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊ नये. असे प्रवेश दिल्यास महायुतीमधील वातावरण खराब होते. त्यामुळे असे प्रवेश मी थांबविले आहेत. एकमेकांच्या विरोधात विधाने येऊ नयेत. सर्वांनी संयम बाळगणे गरजेचे आहे. युती म्हणून सर्वांनी महायुतीचा धर्म पाळावा, मी सुद्धा मुख्यमंत्र्यांना भेटून वस्तुस्थिती कानावर घालेन. भाजपमधील कोणाचेच प्रवेश आमच्या पक्षात झालेले नाही. आमची कायम भूमिका अशी आहे. की, युतीने एकत्रच निवडणुका लढल्या पाहिजे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री जो निर्णय देतील तो आम्हाला मान्य असेल. महायुती स्वबळाचा नारा असे निर्णय वरिष्ठांकडून होत असतात. युती म्हणून सर्व निवडणुका एकत्र लढल्या पाहिजेत. त्यामुळे युतीतील वातावरण चांगले राहिले पाहिजे असा मी सर्वांना सल्ला देईन. शिवसेनेतील ते सर्व ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा पक्षाला होईल. असे मतही यावेळी आमदार दिपक केसरकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### श्रीकांत शिंदेंनाही भाजप घेरणार, कल्याण-डोंबिवलीत शड्डू ठोकला, होम ग्राउंडवर रविंद्र चव्हाण आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील बहुतांशी ठिकाणी 'शत प्रतिशत'चा नारा भाजपकडून देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यानुसारच आता भाजपकडून महापालिका निवडणुकांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. ठाणे महापालिकेत भाजपकडून स्वबळाची तयारी केली जात असताना आता दुसरीकडे बाजूच्या कल्याण डोंबिवली महापालिकेतही स्वबळाचे संकेत देण्यात आले आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेचा पुढील महापौर भाजपचा असावा असे वक्तव्यच प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले आहे.

## मी मंत्री पदासाठी देवाकडे प्रार्थना करत नाही, मी आहे तिथे समाधानी माजीमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची स्पष्टोक्ती

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मी मंत्रीपदासाठी दर्शनाला गेलो नाही, उद्या मंत्री झालो एकादा चुकीचे शब्द तोंडातून गेले तर चार दिवस मीच टीव्हीवर दिसणार, त्यामुळे मी आहे तिथे ठिक आहे. अशी प्रतिक्रिया माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्यात निवडणूक आयोग अंमलबजावणी करेल, शिल्लक जागेवर ओबीसी आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे जास्त जागा उपलब्ध होतील. निवडणुका होणे गरजेचे आहे. निवडणुका होत नाहीत, त्यामुळे त्याचे दुष्परिणाम आपण पाहत आहे. एका आयुक्ताचे बेहिशोबी मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. जवळपास एक हजार कोटी रुपयांची मालमत्ता सापडली आहे. लोकप्रतिनिधीचा अंकुश नसल्याने हे घडत आहे. सुप्रिम कोर्टाचे निकाल आता लागले आहे.



त्यामुळे एकदा निवडणुका होउदे, प्रभाग रचनेबाबत राज्य सरकारचे अधिकार आहेत.

आरक्षण काढताना शिल्लक जागेवर ओबीसी आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे ओबीसी ला फायदा होईल. योग्य दिशा दिली ते एकत्र आले तर, कार्यकर्त्यांनी पण एकत्र यावे असे ते बोलले असतील तर त्यात गैर काय? ते दोघे एकत्र आले तर दूर-दूर पर्यंत भाजपाचा नुकसान होणार नाही. जोपर्यंत आम्ही चांगले करू तोपर्यंत जनता आमच्या सोबत आहे. त्यामुळे हे दोघे एकत्र आले, तरी आमचा नुकसान होणार नाही. स्थानिक युनिटला विचारात न घेता तर पक्षप्रवेश झाले तर कार्यकर्ते नाराज होतात. मी हे नाकारणार नाही कारण मी पण भोगता आहे. पक्ष म्हणजे शनी शिंगणापूर नव्हे सर्वासाठी दरवाजे उगडे नको, ही माजी सुचना नाही तर कार्यकर्त्यांची भावना आहेत. पुणे प्रकरणा प्रमाणे आशा घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहेत.

गुन्हा तर दाखल झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आपण म्हणतो, त्यामुळे गुन्हा नोंद होत नसेल तर चिंतेची बाब आहे. अशा गोष्टीकडे गंभीरतेने पाहिले नाही तर दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात ५६ लाख केसेस पेंडिंग आहेत. यामुळे गुन्हेगारांना भीती राहणार नाही. मी एक साधक आहे. त्र्यंबकेश्वरला जाऊन दर्शन घेतले. मंत्रीपदासाठी दर्शनाला गेलो नाही, उद्या मंत्री झालो एकादा चुकीचे शब्द तोंडातून गेले तर चार दिवस मीच टीव्हीवर दिसणार, त्यामुळे मी आहे तिथे ठिक आहे. अशी प्रतिक्रिया माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# घोडबंदर रोड येथील मेट्रो रेल्वे कामाची पाहणी केली

**ठाणे/प्रतिनिधी :** गायमुखपासून कापूरबावडी पर्यंत मेट्रोची काम चालू आहे. त्याची आम्ही पाहणी करतोय. अनेक नागरिकांची तक्रार आहे.मेट्रोचे पिलर रस्त्याच्या मधोमध आले आहेत. वस्तुस्थिती आहे नाकारता येत नाही. हा सर्विस रोड मुख्य रस्त्यात मर्ज केला आहे. पिलर जे मध्ये आलेत त्यावर मार्ग काढला आहे. वाहतूक कोंडी विरहित परिसर मिळणार आहे. सर्विस रोड मुख्य रस्त्यात मदत झाल्यावर वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होईल. अशी माहिती घोडबंदर रोड येथील मेट्रो रेल्वे कामाची पाहणी केल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, राज ठाकरे यांनी एकत्र कोणासोबत येणार हे त्यांनी सांगितलेलं नाही. वीस वर्षानंतर एकत्र ते भारतीय जनता पार्टी सोबत येऊ शकतात, शिवसेना आमच्या सोबत येऊ शकतात. अजून युती आघाडी झालेली नाही, पुढे भविष्यात काय होईल सांगता येत नाही. मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका महायुतीची सत्ता

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माध्यमांशी माहिती



येईल.हिंदी भाषिकांचा अपमान करून मराठी भाषा पुढे नेण्याचे धोरण जर त्यांचं नसेल तर त्यांच्या भूमिकेचे स्वागत करायला हवं. हिंदी भाषिकांना मारहाण करण्यापेक्षा त्यांच्या कानाखाली आवाज काढण्यापेक्षा शिवीगाळ करण्यापेक्षा त्यांना जर प्रेमाच्या भाषेमध्ये जशी शिवसेनेची भाषा आहे आणि शिवसेनेच्या शाखेमध्ये मराठी भाषेची पुस्तके ठेवलेली आहेत.हिंदी भाषिकांना आम्ही ते शिकवतो. मराठी भाषेत तेवढेच आहेत फक्त हिंदी भाषिकांची संख्या वाढत चाललेली आहे. असे मतही यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# मंत्र्यांना शासनाकडून निवासस्थान दिलं जात, पण तिथे कोणी राहत असेल तर बाहेर कसं काढणार : मंत्री छगन भुजबळ यांची माध्यमांशी प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** धनंजय मुंडे सातपुडा बंगला,मी २० मेला मंत्रिमंडळात शपथ घेतली. प्रशासनाकडून मंत्र्यांची ऑफिस, निवासस्थान कुठे असावीत याची व्यवस्था पाहिली जाते. त्यांनीच मला तुमच्यासाठी अमुक निवासस्थान आहे, हे सांगितलं. मात्र, तिथे कुणी राहत असेल तर आपण त्यांना कसं बाहेर काढणार. मी त्यांना ( धनंजय मुंडे ) एक शब्द देखील बोललेली नाही. अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की,मुख्यमंत्री काय तो निर्णय घेतील. मी अजित पवारांना सांगितले, की घर खाली झालं की जाईन.ते आमचे सहकारी ( धनंजय मुंडे ), मी काय तक्रार करणार. मी उलट मुख्यमंत्र्यांना सांगेन दुसर छोटं मोठ घर असेल तरी हरकत नाही. मी यावर जास्त चर्चा करणार नाही. सामान शिफ्ट करायचं असेल तर मुदत वाढवून घेतात, नसेल तर दंड, भाडं द्याव लागतं.उद्धव ठाकरे इंडिया आघाडीत आहेत. पुढच्या निवडणुका, इतर काही काम असतात, अधिवेशन सुरू आहे. ते एका पक्षाचे नेते आहेत. सगळ्या पक्षांचे नेते एकत्र येतात, त्यात नवीन काही वाटत नाही. मला स्वतःला वाटत, (मुंबई सोडून) इतर ठिकाणी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र लढणं मोठं कठीण आहे. प्रत्येक ठिकाणी प्रत्येक पक्षाची ताकद वेगळी असते.सगळ्या ठिकाणी वेगवेगळी परिस्थिती असते.

कार्यकर्त्यांच्या तिकिटासाठी अपेक्षा असतात. मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितलं आहे, महायुतीत काही ठिकाणी एकत्र तर काही ठिकाणी वेगळ लढू अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. प्रत्येक पक्षात कार्यकर्त्यांची मनस्थिती अशीच आहे. मुख्यमंत्री सांगितली तीच आमची भूमिका आहे. संजय शिरसाट वक्तव्यावर बोलताना ते म्हणाले की, आपल्या बापाचेच पैसे आहे. सर्वांच्या बापाचा पैसा,सर्व जनतेचा हा पैसा हा मंत्र्यांचा, मंत्री मंडळाचा पैसा नाही, जनतेचा पैसा आहे. जरांगे पाटील आंदोलन लोकशाहीत आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. ते पण कशासाठी आंदोलन करता आहेत. मला माहित नाही, दुबे फडणवीस वक्तव्य महाराष्ट्रात मराठीचा अपमान कुणीही सहन करणार नाही. राज्य



भाषेचा अपमान कुणीही सहन करू शकत नाही. संविधानाप्रमाणे कोणी कुठेही जाऊ शकतो,उद्योग धंदा करू शकतो. मात्र त्या भाषेचा मान सन्मान ठेवला पाहिजे, ऑन पुणे तरुणी प्रकरण मुख्यमंत्र्यांनी देखील माहिती घेतली असेल, चौकशी करून कारवाई केली जाईल.डान्स बार बंद आहेत.

डान्स बार आपल्याकडं नकोत. हे मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठरलं. त्याच्या विरोधी जाऊन कुणी असे प्रकार करत असतील तर ते थांबले पाहिजे,कुणी कायदा हातात घेऊ नये, नाशिक पालकमंत्री माझ्याकडे ज्या ज्या तक्रारी येतात. त्यावर मार्ग काय काढण्यासाठी प्रयत्न केलेत. पोलिसांना वाहतूक नियमनाचे प्रशिक्षण देण्यासंदर्भात देखील बोलणे झाले.सिग्नल व्यवस्थित चालू राहिले पाहिजे. लाल सिग्नल मिळाला की गाडी थांबलीच पाहिजे,त्र्यंबकेश्वर रस्ता खड्ड्यात गेला आहे. याबाबत पीडब्यूलडी विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलतो, अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरू

## पहिल्या ५० पात्र अर्जदारांना विविध शासकीय सवलती मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महसूल व वन विभागाच्या २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार एम-सॅण्ड (कृत्रिम वाळू) धोरण निश्चित करण्यात आले असून शासन परिपत्रक दि १७ जुलै २०२५ नुसार शासनाने याबाबतची मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यात एम-सॅण्ड धोरणाची अंमलबजावणी सुरू असून जिल्ह्यातील पहिल्या ५० इच्छुक पात्र अर्जदारांना एम-सॅन्डबाबत विविध शासकीय सवलती देण्यात येणार आहेत.

एम-सॅण्ड युनिट स्थापनेसाठी मिळणाऱ्या प्रमुख सवलतीनुसार औद्योगिक मान्यता, अनुदान (उदा. औद्योगिक प्रोत्साहन, व्याज, वीज कर), मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये ४०० रुपये प्रति ब्रास सवलत देवून (२०० रु प्रतिब्रास दराची तरतुद), शासन किंवा निमशासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सॅन्डचा २० टक्के वापर बंधनकारक, टप्याटप्प्याने हे प्रमाण १००% एम-सॅण्ड वापर बंधनकारक.

शासकीय जमिनीवर खाणपट्टा लिलाव पद्धतीने दिला जाणार असून, केवळ ''१००% एम-सॅण्ड उत्पादक'' असलेल्यांनाच पात्रता राहील. खाजगी जमिनीवर इच्छुक ''१००% एम-सॅण्ड उत्पादक'' अर्जदारांनी महाखनिज पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. १५ दिवसांत अर्ज सादर करणेबाबत जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे. पूर्वीचे खाणपट्टे जर ''१००% एम-सॅण्ड उत्पादन'' करणार असतील, तर त्यांनाही धोरणांतर्गत लाभघेता येणार. प्रत्येक प्रकरणात प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सीटीई, नियोजन प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र, उद्योग आधार किंवा जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी, तसेच आवश्यक परवानग्या अनिवार्य राहतील.



**युनिट सुरू करण्यासाठी ६ महिने**

अवैध उत्खनन वा वाहतूक प्रकरणात दोषी असलेल्यांना अर्ज करता येणार नाही. इच्छुक अर्जदार यांनी शासनाची मान्यता मिळाल्यानंतर युनिट सुरू करण्यासाठी ६ महिन्यांची कालमर्यादा बंधनकारक आहे. युनिट सुरू करण्याआधी प्रदुषण विभागाचे कंटेंट टू ऑपरेट घेणे बंधनकारक आहे.

**अर्ज कसा करायचा**

अर्ज करण्यासाठी https://mahakhanij.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अप्लिकेशन हा पर्याय निवडुन त्यामधील एम सॅण्ड कन्सेशन अप्लिकेशनमधून अर्जाचा पर्याय निवडुन अर्ज करावा.

**संपर्क कुठे करायचा**

एम-सॅण्डबाबत कोणतीही अडचण असल्यास गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी शासन निर्णय दि. २३ मे २०२५ आणि शासन परिपत्रक दि. १७ जुलै २०२५ यांचा संदर्भ घ्यावा. एम-सॅण्ड धोरणाच्या अनुषंगाने जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# राजेश नागरे यांचा महाराष्ट्र स्तरावरील समाजरत्न पुरस्काराने सन्मान

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** राजेश नागरे यांना महाराष्ट्र स्तरावरील समाज रत्न पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले लोणार तालुक्यातील. किनगाव जट्टू येथील.फुले शाहू.आंबेडकर विचार मंचाचे अध्यक्ष राजेश सखाराम नागरे यांना.व संपूर्ण महाराष्ट्र मध्ये. सामाजिक कार्य करणाऱ्या दैवत फाउंडेशन शेवगाव या संस्थेच्या वतीने ३. ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा अहिल्या नगर स्वराज मंगल कार्यालय मध्ये अनेक मान्यवराच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार वितरण सोहळा करण्यात आला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सामाजिक सांस्कृतिक आरोग्य विद्यार्थी विकास. महिला बालकल्याण. समशानभूमी.. दिव्यांग सह . अशी विविध समाज उपयोगी उपक्रम गावात राबवून समाजामध्ये जनजागृती करण्याचे काम करणाऱ्या अनेक व्यक्तीचे इथे सत्कार करण्यात आले त्यामध्ये किनगाव जट्टू येथील फुले शाहू आंबेडकर



विचार मंचाचे अध्यक्ष राजू सखाराम नागरे व ग्राम विकास अधिकारी विनोद शामराव सातपुते यांना सुद्धा समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले गेली २०. वर्षापासून राजू नागरे हे गावांमध्ये सातत्याने सामाजिक उपक्रम राबवून समाजामध्ये जनजागृती काम करत असल्यामुळे त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना समाज रत्न पुरस्कार देण्यात आला.

यावेळी त्यांना सन्मानपत्र शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष. म्हणून दैवत फाउंडेशनचे प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष अरुण भाऊ मुंडे ह भ प अशोक महाराज इलक ह भ प सुदर्शन महाराज शास्त्री आनंदग्राम संस्थेचे व जीवन गौरव पुरस्कार करते.व. अध्यक्ष दत्ताभाऊ बारगजे. महाराष्ट्र भाजपा डॉ. सेल प्रदेशाध्यक्ष डॉ. सुनील भाऊ कायंदे लोकनेता वृत्त पत्राचे संपादक अध्यक्ष ज्ञानेश्वर बुधवंत विक्रांत पालवे. आहिल्या नगर विनोद सातपुते ग्रामविकास अधिकारी प्रदीप कुटे यांच्यासह अनेक मान्यवरच्या. उपस्थितीत झाला या पुरस्काराबद्दल त्यांचा सर्व स्तरावरून अभिनंदन वर्षाव होत आहे

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील निष्काळजीपणामुळे बाळाचा मृत्यू

■ पळसखेड येथील महिलेची तक्रार

■ दोषींवर सदोष कठोर कारवाईची करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** जिल्हा स्त्री रुग्णालय, वाशीम येथे वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे प्रसूतीदरम्यान बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप पळसखेड तालुक्यातील येथील लता नामदेव गव्हाणे यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात या प्रकरणी संबंधित डॉक्टर, नर्स आणि खाजगी कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे.

लता गव्हाणे यांच्या म्हणण्यानुसार त्यांची सून शिवानी वैभव गव्हाणे हिला २ ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजता प्रसूतीसाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासण्या करून अहवाल नॉर्मल असल्याचे सांगण्यात आले आणि सकाळी १० वाजेपर्यंत प्रसूती होईल असे सांगण्यात आले. मात्र रात्रीपासून तीव्र प्रसववेदना सुरू असूनही कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आणि नर्सेस यांना वारंवार विनंती करूनही कोणीही रुग्णाची दखल घेतली नाही. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडे सतत विनंती करूनही सकाळी ३ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत कोणीही आले नाही. अखेर सायंकाळी ५ वाजता तपासणी करण्यात आली तेव्हा रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर झाली होती. त्यानंतर रुग्णावर अमानुष प्रकारे प्रसूतीसाठी दडपशाही करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, प्रसूती करताना रुग्णाच्या गालावर मारणे, अयोग्य पद्धतीने पोटावर दाब देणे, अयोग्य व्यक्तींमार्फत उपचार करणे असे प्रकार घडले. त्याचे ठसे रुग्णाच्या शरीरावर आजही स्पष्टपणे दिसत आहेत. सायंकाळी ५.३० वाजता प्रसूती झाली पण डॉक्टरांनी बाळाच्या हृदयाचे ठोके नसल्याचे सांगून बाळ मृत असल्याचे जाहीर केले. लता गव्हाणे यांनी या संपूर्ण घटनेला रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणाला जबाबदार धरले असून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करावा वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्तींनी तपासणी का केली, याची चौकशी करावी भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी रुग्णालय व्यवस्थापनाने योग्य उपाययोजना कराव्यात दोन ऑगस्ट रोजी सकाळी तीनपासून सायंकाळी पाचपर्यंत नातेवाईकांनी विनंती करूनही कोणीच दखल घेतली नाही, याची जबाबदारी निश्चित करावी ही घटना केवळ एका कुटुंबाला झालेला मानसिक आघात नसून, संपूर्ण आरोग्य व्यवस्थेतील ढासळलेल्या जबाबदारीचे लक्षण आहे. जिल्हा प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी पीडित लता गव्हाणे यांनी केली आहे.

### प्रथमदर्शनी दोषी तीन कर्मचाऱ्यांना केले कार्यमुक्त

या घटने बाबत महिलेची तक्रार प्राप्त झाली असून प्रथमदर्शनी चौकशी केली असता यामध्ये तीन कर्मचारी दोषी आढळले असल्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे पुढील चौकशी सुरू आहे

**-डॉ सचिन साळवे**
**अधीक्षक जिल्हा महिला रुग्णालय वाशिम**

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश अर्जाची १७ ऑगस्ट अंतिम मुदत

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांच्या पत्रानुसार १२ वी नंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे.

अर्ज http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ ऑगस्ट २०२५ आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी. तसेच एम.ए., एम.एस.सी. अशा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज करता येईल. अर्जांची छाननी १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान होईल. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी २२ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीतील पात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत ४ सप्टेंबर आहे. त्यानंतर उर्वरित रिक्त जागांवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड करून यादी ५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होईल.

या दुसऱ्या यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेण्याची अंतिम मुदत २५ सप्टेंबर २०२५ ठेवण्यात आली आहे. ही सर्व प्रक्रिया शासन निर्णयामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी इतर मागास बहुजन कल्याण सहाय्यक संचालक मनोज मेरत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बुलढाण्याचा राष्ट्रीय सन्मान !; स्वातंत्र्य दिनासाठी बोथा येथील वनीता बोराडे यांना राष्ट्रपती भवनाकडून विशेष आमंत्रण

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे आयोजित ''ॲट होम रिसेप्शन '' या समारंभासाठी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील बोथा येथील सोयरे वनचरे फाउंडेशनच्या वनीता जगदेव बोराडे यांना विशेष आमंत्रण पाठविण्यात आले आहे. हे आमंत्रणपत्र असलेली पार्सल पिशवी वनीता बोराडे यांच्या पत्त्यावर पाठविण्यात आली असून, ही बाब बुलढाणा जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. पार्सल वितरणाची कार्यवाही डाक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. वितरणाच्या माहितीसाठी मेहकर उपविभागीय डाक निरीक्षक जी. बी. काळे, डाकघर सहायक अधीक्षक कै. का. तायडे यांना संपर्क साध्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पूनम संजय बनसोडे यांची 'राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग संघर्ष समिती'च्या महिला आघाडी बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** समाजातील वंचित, दिव्यांग, आणि कला-संस्कृती क्षेत्रातील दुर्लक्षित घटकांसाठी आपल्या आवाजाने आणि कृतीने नेहमीच आघाडीवर राहिलेल्या पूनम संजय बनसोडे यांची 'राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग संघर्ष समिती'च्या महिला आघाडी बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीने केवळ पुनम ताईंच्या सामाजिक कार्याची दखल घेतली गेली नाही, तर महिलांना संघटनेत सक्रिय नेतृत्व देण्याची दिशा स्पष्ट केली आहे. त्यांची ओळख एक सजग सामाजिक कार्यकर्ती, संवेदनशील गायिका, प्रभावी वक्त्या आणि सर्वसामान्य महिलांची

### सेवाभावी कार्याला मिळाली मोठी दाद

मदतनीस अशी आहे.

कार्यकुशलतेवर विश्वास, संधीच्या नावावर निव्वळ फोटोबाजी करणाऱ्यांना चपराक आज अनेक संघटनांमध्ये महिलांना केवळ नावापुरती पदे देण्यात येतात, पण पूनम ताईंसारख्या खऱ्या कार्यकर्त्यांना दिलेले नेतृत्व हे अन्य संघटनांसाठी आरसा ठरावे. अनेक महिलांची कामं गाजत असताना, त्यांना मागे ठेवले जाते. अशा वेळी ही निवड निव्वळ औपचारिक नसून कार्यक्षमता ओळखून दिलेली जबाबदारी आहे, हे विशेष!



समितीचे अध्यक्ष मा. संदीप बोरकर यांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली असून, हा निर्णय संघटनेच्या सामाजिक बांधिलकी आणि भूमिकेचे स्पष्ट उदाहरण मानले जात आहे. या निवडीप्रसंगी संघटनेचे राज्य संघटक विजय चव्हाण, पांडुरंग सपकाळ, सतीश बोरकर, दुर्गादास काटे महाराज, संजय पवार, आणि शिवाजी काटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी या निवडीचे स्वागत करत, पूनम ताईंच्या नेतृत्वात जिल्ह्यात महिला आणि कलावंतांसाठी नवीन दिशा निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

### पदभार स्वीकारताच ठोस भूमिका

पदभार स्वीकारताच पुनम ताईंनी सांगितले की, ''दिव्यांग, निराधार, महिला आणि लोककलावंत हे समाजात अजूनही उपेक्षित आहेत. शासनाच्या योजना मजुरांपर्यंत पोहोचत नाहीत. संघटनेच्या माध्यमातून मी या लोकांचा आवाज बनेन. कार्यालयात हेलपाटे मारणाऱ्यांपेक्षा आम्ही रस्त्यावर लढायला तयार आहोत.'' त्यांचा हा निर्धार त्यांच्या नेतृत्वाचा ठसा पहिल्या दिवसापासून उमटवतो.

## विविध वृत्त...

### पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या अपमानास्पद वक्तव्याचा निषेध





दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात पार पडलेल्या पंतप्रधान आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सार्वजनिकरित्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याबाबत अपमानास्पद, असभ्य व धमकीच्या स्वरूपाचे वक्तव्य केले. सदर अधिकारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत असताना झालेला हा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून, यामुळे केवळ परभणी नव्हे तर संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. अधिकारी वर्गाच्या मनोबलावरही त्याचा प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी ड्रेस कोडमध्ये काळी फीत लावून कामकाज करत आपला शांततापूर्ण निषेध नोंदवला. पंचायत समिती आमगाव येथे आयोजित कार्यक्रमात तालुका शाखेच्यावतीने अध्यक्ष योगेंद्र कटरे यांच्या नेतृत्वाखाली संबंधित वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला.

### वर्ध्यात युद्ध व हिंसेच्या विरोधात विश्व शांती प्रार्थना व पदयात्रा




दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** जगभर वाढत असलेल्या युद्ध, दहशतवाद, हिंसा आणि अमानवी घटना याच्या विरोधात आणि मानवता, शांतता व करुणा यांच्या समर्थनार्थ सर्व सेवा संघ, सेवाग्राम यांच्या वतीने ''विश्व शांती प्रार्थना व पदयात्रा'' चे आयोजन करण्यात आले.

ही पदयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. पदयात्रेनंतर सर्व धर्मांच्या सामूहिक प्रार्थनेद्वारे विश्वशांतीची भावना व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमात देशभरातून आलेले सर्व सेवा संघाचे सदस्य, सेवाग्राम व वर्धा येथील गांधी विचारांवर श्रद्धा असलेले नागरिक सहभागी झाले.

### शाळकरी मुली व दिव्यांग महिलांसाठी अनुदान योजना !

मुलींना लेडीज सायकल तर दिव्यांग महिलांना पिठाची चक्की खरेदीसाठी अनुदान मिळणार, अर्ज प्रक्रिया ५ ऑगस्टपासून सुरु होणार

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती प्रवर्गातील शाळकरी मुलींसाठी आणि दिव्यांग महिलांसाठी लेडीज सायकल आणि पिठाची चक्की खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेनुसार सन २०२४-२५ अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील ७ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींना लेडीज सायकल खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत दिव्यांग महिला आणि मुलींना पिठाची चक्की खरेदीसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. या दोन्ही योजनांसाठी पात्र महिला लाभार्थींनी आपल्या तालुक्याच्या एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयातून विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त करून, आवश्यक कागदपत्रांसह तो पूर्ण भरून सादर करणे अपेक्षित आहे. अर्जाचे नमुने व अटी-शर्ती संबंधित प्रकल्प कार्यालयात तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर zpbuldhana.maharashtra.gov.in उपलब्ध आहेत. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ४ सप्टेंबर २०२५ असून, अर्ज स्वीकारण्याची कालमर्यादा ५ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणार आहे. इच्छुक लाभार्थींनी आपले अर्ज बुलढाणा, चिखली, देउळगाव राजा, सिंदखेडराजा, लोणार, मेहकर, मेहकर, मोताळा, नांदुरा, मलकापूर, खामगाव, शेगाव, जळगाव जामोद व संग्रामपूर या तालुक्यांतील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### नवउद्योजकांनी 'मार्जिन मनी' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांसाठी 'मार्जिन मनी' उपलब्ध करून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त समाज कल्याण रविकिरण पाटील यांनी केले .